**महाराष्ट्र शासन**
नगर विकास विभाग
मादाम कामा मार्ग, हुतात्मा राजगुरु चौक, मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२.
Email ID- **nileshkumar.chavan@nic.in**

क्रमांक: एमआरडी-३३२५/प्र.क्र.६९/नवि-३५ दिनांक :- २१/११/२०२५.

## बैठकीचे इतिवृत्त

**विषय :** मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली दि. २०/१०/२०२५ रोजी मंत्रिमंडळ सभागृह,सह्याद्री अतिथिगृह ,मुंबई येथे संपन्न झालेल्या नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची १० वी बैठकीचे इतिवृत्त.

महोदय/महोदया,

उपरोक्त विषयाबाबत मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नागपूर यांच्या अध्यक्षतेखाली दि. २०/१०/२०२५ रोजी मंत्रिमंडळ सभागृह,सह्याद्री अतिथिगृह ,मुंबई येथे नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची १० वी बैठक संपन्न झाली आहे. सदरहू बैठकीचे इतिवृत्तास मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य तथा अध्यक्ष, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नागपूर यांची मान्यता प्राप्त झाली असून सदर इतिवृत्त माहिती व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी सोबत जोडून पाठविण्यात येत आहे.

आपला,

२१/११/२०२५

( निलेशकुमार चव्हाण )
कक्ष अधिकारी , महाराष्ट्र शासन

प्रति,

महानगर आयुक्त, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,नागपूर.

प्रत: संग्रहार्थ (नवि-३५).

क्रमांक : नामप्रविप्रा/प्राधि.बैठक/१०

नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण
स्टेशन रोड, सदर, नागपूर-४४०००१.
फोन नं. २५३३२०२, पी.बी.एक्स.नं. २५३१४३१,
२५३१४३२, फॅक्स नं. ०७१२-२५३१४३१

दिनांक : २९ ऑक्टोबर, २०२५

नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची १० वी बैठक दि. २० ऑक्टोबर, २०२५ (सोमवार) रोजी झाली असून त्यासंबंधीचे कार्यवृत्त मंजूरीस्तव सादर करण्यात येत आहे.

२. नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, २०१६ च्या कलम ८ नूसार प्राधिकरणाच्या सन्माननीय अध्यक्षांनी कार्यवृत्तावर स्वाक्षरी करून अधिप्रमाणित करणे आवश्यक आहे. तरी या संदर्भात मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य तथा प्राधिकरणाचे सन्माननीय अध्यक्ष यांनी या टिप्पणीसोबत जोडलेल्या उपरोक्त कार्यवृत्ताच्या प्रत्येक पृष्ठावर Chairman's Initials या खुणेच्या जागी कृपया स्वाक्षरी करून कार्यवृत अधिप्रमाणित करावे अशी विनंती आहे.

महानगर आयुक्त
ना.म.प्र.वि.प्रा. नागपूर

मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य तथा
अध्यक्ष, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण,
नागपूर.

## नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या १० व्या बैठकीचे कार्यवृत्त

दिनांक :– २० ऑक्टोबर, २०२५ (सोमवार)
वेळ :– दुपारी ३.०० वाजता
स्थळ :– सह्याद्री राज्य अतिथी गृह,
बी. जी. खेर मार्ग, मलबार हिल, मुंबई–०६

<u>उपस्थित सदस्य :</u>

मा. श्री. देवेंद्र फडणवीस – अध्यक्ष
माननीय मुख्यमंत्री, महाराष्ट्र राज्य

मा. श्री. चंद्रशेखर बावनकुळे – सदस्य
मा. पालकमंत्री नागपूर जिल्हा, नागपूर

मा. श्री. असिमकुमार गुप्ता – सदस्य
मा. अपर मुख्य सचिव, नगर विकास विभाग (१).

मा. श्री. असिमकुमार गुप्ता – सदस्य
मा. अपर मुख्य सचिव, गृहनिर्माण विभाग, (अति. कार्य.)

मा. श्री. रविंद्रकुमार सिंगल (दुरदृश्य प्रणालीद्वारे) – सदस्य
मा. पोलिस आयुक्त, नागपूर शहर, नागपूर

मा. श्री. अभिजीत चौधरी (दुरदृश्य प्रणालीद्वारे) – सदस्य
मा. आयुक्त, महानगरपालिका, नागपूर

श्री. विनायक महामुनी (दुरदृश्य प्रणालीद्वारे) – सदस्य
मा. प्रशासक तथा मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद नागपूर.

मा. श्री. संजय मीणा – सदस्य सचिव
मा. महानगर आयुक्त, ना.म.प्र.वि.प्रा. नागपूर

बैठकीच्या सुरूवातीस माननीय मुख्यमंत्री तथा अध्यक्ष, ना.म.प्र.वि. प्राधिकरण यांचे महानगर आयुक्त यांनी प्राधिकरणाच्या वतीने स्वागत केले.

त्यानंतर विषय पत्रिकेवरील बाबी विचारार्थ घेण्यात आल्या.

महानगर आयुक्त
ना.म.प्र.वि.प्रा.

विषय क्र. १/१०/२०/१०/२०२५

नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या बुधवार, दिनांक १२ फेब्रुवारी, २०२५ रोजी संपन्न झालेल्या नवव्या बैठकीतील निर्णय तथा सुचनांचा अनुपालन अहवाल.

अनुपालन अहवाल कायम करण्यात आला.

विषय क्र. २/१०/२०/१०/२०२५

नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या मालकीच्या सर्व मालमत्तांच्या व्यवस्थापन, देखभालीसाठी आणि दिर्घकालीन व शाश्वत उत्पन्नांचे स्त्रोत तयार करण्यासाठी स्वतंत्र **Nagpur Metropolitan Asset Management Company Limited** स्थापन करणे.

२.१ सदर प्रस्तावाबाबत महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, राज्य शासनाच्या २ मे २०२५ च्या शासन निर्णयान्वये प्राधिकरण हद्दीतील ७१६८ हे.आर शासकीय जमिन प्राधिकरणाकडे वर्ग केली आहे. याशिवाय केंद्र व राज्य शासनाच्या अनुदानातून अनेक प्रकल्प राबवले जातात. यातून अनेक मालमत्ता व संपदा तयार झालेल्या आहेत, या सर्व मालमत्तांचे योग्य व्यवस्थापन करणे आवश्यक आहे. या शिवाय महानगर क्षेत्रामध्ये प्राधिकरणा मार्फत 'नविन नागपूर' हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प नियोजित आहे, तसेच प्राधिकरण नागपूर शहराभोवती १४८ किमी लांब व १२० मी रूंद असा नविन बाह्य वळण रस्ता निर्माण करत आहे.

२.२ प्राधिकरणामार्फत निर्माण झालेल्या व भविष्यात निर्माण होणाऱ्या सर्व संपदांचे दिर्घकालीन व्यवस्थापन करणे, त्यातून उत्पन्नाचे स्त्रोत निर्माण करणे व या माध्यमातून प्राधिकरणाचे निधी संकलनात वाढ करणे आवश्यक आहे. यासाठी प्राधिकरणाच्या नियंत्रणाखाली स्वतंत्र **Nagpur Metropolitan Asset Management Company Ltd.** या नावाची स्वतंत्र **Special Purpose Vehicle** स्थापन करण्याचे प्रस्तावित आहे. यास प्राधिकरणाने मान्यता दिल्यास प्रस्ताव शासन मान्यतेसाठी पाठविण्यात येईल.

२.३ सादर केलेल्या विषयावर चर्चा झाली व त्यानंतर विचार होऊन खालील प्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव क्र. २/१०/२०/१०/२०२५ : "असा ठराव करण्यात येत आहे की, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या मालकीच्या तयार झालेल्या व भविष्यात निर्माण होणाऱ्या सर्व मालमत्ता जसे अभिन्यास, डिपी रोड, एसटीपी मलनिस्सारण व पाणीपुरवठा योजना, तिर्थक्षेत्र विकास प्रकल्प, खुल्या जागा, नविन नागपूर प्रकल्प, प्रस्तावित बाहय वळण रस्ता यांच्या देखभालीसाठी, व्यवस्थापनासाठी आणि दीर्घकालीन व शाश्वत उत्पन्नांचे स्त्रोत तयार करण्यासाठी, निधी उभारण्यासाठी स्वतंत्र Nagpur Metropolitan Asset Management Company Ltd. स्थापन करण्याबाबतचा प्रस्ताव शासन मान्यतेसाठी पाठविण्यास्तव प्राधिकरणाची मंजूरी प्रदान करण्यात येत आहे."

महानगर आयुक्त
ना.म.प्र.वि.प्रा.

मा. अध्यक्ष
ना.म.प्र.वि.प्रा.

विषय क्र. ३/१०/२०/१०/२०२५

नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रातील वाहतूक व्यवस्थापनासाठी स्वतंत्र असे **Nagpur Metropolitan Parivahan Limited** स्थापन करणे.

३.१ सदर प्रस्तावाबाबत महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, नागपूर महानगर क्षेत्रात बससेवा, मेट्रो, ऑटो या सार्वजनिक तसेच खाजगी वाहतुकीच्या सेवाही पुरवल्या जातात. या सर्व सेवांमध्ये सुसूत्रता आणणे, समन्वय साधणे तसेच वाहतुकीच्या नविन मार्गांची निर्मिती करणे आवश्यक आहे.

३.२ महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम २०१६ च्या कलम १८ मधील तरतूदींनुसार प्राधिकरणाच्या हद्दीतील सार्वजनिक बस सेवा, फिडर सेवा, मोबाईल ॲप व स्मार्ट कार्डद्वारे तिकिट प्रणाली, मल्टी मॉडल इंटिग्रेशन, पर्यावरण पुरक सेवा या सर्व बाबींचे नियंत्रण ठेवणे, नागरिकांना परवडणारी विश्वासार्ह वाहतूक सेवा उपलब्ध करणे यासाठी नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्या नियंत्रणाखाली स्वतंत्र अशी **Nagpur Metropolitan Parivahan Limited** स्थापन करण्याचे प्रस्तावित करण्यात येत आहे. ही कंपनी स्वतंत्र विशेष उद्देश वाहन **(Special Purpose Vehicle)** म्हणून कार्यरत राहिल. याला प्राधिकरणाने मान्यता दिल्यास शासन मान्यतेसाठी प्रस्ताव पाठवण्यात येईल.

३.३ सादर केलेल्या विषयावर चर्चा झाली व त्यानंतर विचार होऊन खालील प्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव क्र. ३/१०/२०/१०/२०२५ : **"असा ठराव करण्यात येत आहे की,** नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण हद्दीतील वाहतूक व्यवस्थापन करणे, सार्वजनिक व खाजगी वाहतूकीत सुसूत्रता आणणे, वाहतूकीच्या नविन व फिडर मार्गाची निर्मिती करणे, याचा प्राधिकरणाच्या विकास आराखडयाशी समन्वय साधणे, यासाठी स्वतंत्र Nagpur Metropolitan Parivahan Limited या नावाची स्वतंत्र कंपनी स्थापन करण्याबाबचा प्रस्ताव शासनाचे मान्यतेस्तव पाठविण्यास प्राधिकरणाची मंजूरी प्रदान करण्यात येत आहे."

विषय क्र. ४/१०/२०/१०/२०२५

नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचा सुधारीत आकृतीबंध मंजुरीबाबत.

४.१ सदर प्रस्तावाबाबत महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची स्थापना ही महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम २०१६ अन्वये, दिनांक ०४/०३/२०१७ रोजी करण्यात आलेली असून, प्राधिकरणाचे कामकाज हाताळण्याकरीता सध्या कोणताही आकृतीबंध मंजूर नाही. प्राधिकरणाचे कामकाज राज्य शासनाचे प्रतिनियुक्ती वरील अधिकारी व नागपूर सुधार प्रन्यासचे कर्मचारी यांच्या मार्फत चालवले जाते. नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या कार्यक्षेत्रात झालेला विस्तार तसेच प्राधिकरण क्षेत्रात मुलभूत सुविधा उपलब्ध करून देण्याकरीता सुरू असलेली विकास कामे या करीता प्राधिकरणाचा स्वत:चा आकृतीबंध असणे, पदसंख्या निर्धारित असणे, पदाचे सेवाप्रवेश नियम, अर्हता व पदांचे कर्तव्य या बाबी निश्चित करणे आवश्यक आहे.

महानगर आयुक्त
ना.म.प्र.वि.प्रा.

मा. अध्यक्ष
ना.म.प्र.वि.प्रा.

४.२ याबाबत यापूर्वीचे प्राधिकरणाच्या ३ ऱ्या बैठकीतील ठराव क्र. ८/०३/२०.०८.२०१८ अन्वये प्राधिकरणाने ३५९ अधिकारी व कर्मचारी यांचा आकृतीबंधाचा प्रस्ताव शासनाला पाठवण्यास मान्यता दिली. त्या अनुषंगाने महानगर आयुक्त यांनी दिनांक ३०/१०/२०१८ रोजीच्या पत्रान्वये सदर आकृतीबंध शासनाला सादर केला असता, शासनाचे पत्र क. एनआरडी ३३१९/प्र.क्र. ०२/नवि–७ दिनांक २२/०३/२०१९ अन्वये ३५९ पदांचा प्राधिकरणाने प्रस्तावित केलेला आकृतीबंध हा अव्यवहार्य ठरवला व प्राधिकरणाला नव्याने व तज्ञ समितीच्या मान्यतेने आकृतीबंध सादर करण्याच्या सूचना केल्या.

४.३ याबाबत सह आयुक्त, ना.म.प्र.वि.प्रा. यांच्या अध्यक्षतेखाली तज्ञ समिती नेमली. या समितीने वर उल्लेखीत ३५९ पदांचा आढावा घेतला व त्यापैकी प्राधिकरणाच्या कामकाजाला आवश्यक असणारी १५६ पदे भरण्याचा प्रस्ताव सादर केला या अनुषंगाशने मा. मुख्यमंत्री, महाराष्ट्र शासन यांच्या अध्यक्षतेखाली प्राधिकरणाच्या ५ व्या बैठकीमध्ये ठराव क्र. ११/०५०/०४.०७.२०१९ अन्वये या किमान व तातडीच्या आवश्यक असणाऱ्या १५६ अधिकारी व कर्मचारी याच्या पद संख्येस मान्यता देण्यात आली व सदर पदे भरण्यासाठी महानगर आयुक्त यांनी प्राधिकृत करण्यात आले. त्या अनुषंगाने हा आकृतीबंध शासनास सादर केला असता, शासनाचे दिनांक ०६/०२/२०२४ रोजीचे पत्रान्वये निर्देश दिले की, प्राधिकरणाने प्रस्ताव सादर करतांना पदसंख्या नमूद न करता केवळ सेवाप्रवेश नियम सादर केले आहे. त्यामुळे प्राधिकरणाचा सुधारीत पदांचा आकृतीबंध, त्यांचे सेवाप्रवेश नियम व पदांच्या कर्तव्य आणि जबाबदाऱ्या यासह प्रस्ताव शासनास सादर करावा.

४.४ त्यानुषंगाने बैठकी दरम्यान महानगर आयुक्त यांनी सांगितले की, प्राधिकरणाचे कामकाज अधिकाधिक तंत्रज्ञान स्नेही व स्पर्धाक्षम होत आहे. सबब प्राधिकरणाच्या आस्थापनेवर तांत्रीक व अतांत्रीक अशा पारंपारीक पदांबरोबरच माहिती तंत्रज्ञान क्षेत्रात कार्यरत आयटी प्लॅनर्स, वित्तीय क्षेत्रात कार्यरत Financial Planner, शहर नियोजनासाठी आवश्यक अर्बन प्लॅनर्स, विपणन अधिकारी, यांत्रीकी अधिकारी, जनसंपर्क अधिकारी असे अनेक विभाग आवश्यक आहेत. त्या अनुषंगाने प्राधिकरणाने मान्यता दिलेल्या १५६ पदांच्या विहीत मर्यादेत आकृतीबंध तयार केला आहे. तसेच या १५६ पदांच्या सेवाशर्ती, शैक्षणीक अर्हता व प्रवेश नियम सोबत सादर करण्यात येत आहेत, त्याला प्राधिकरणाने मान्यता प्रदान केल्यास, मान्यतेनंतर सदर प्रस्ताव शासनास पाठवण्यात येईल.

४.५ त्याअनुषंगाने आकृतीबंध खालीलप्रमाणे निर्धारित केलेला आहे.

प्रस्तावित आकृतीबंध

| अ.क्र. | विभाग | प्रस्तावित पदे |
|---|---|---|
| १ | मा. महानगर आयुक्त यांचे कार्यालय | १८ |
| २ | प्रशासन, मानव संसाधन व आस्थापना विभाग | ०७ |
| ३ | विकास व परवानगी विभाग | १५ |
| ४ | नियोजन विभाग | १५ |
| ५ | अभियांत्रिकी विभाग | ४३ |

महानगर आयुक्त
ना.म.प्र.वि.प्रा.

मा. अध्यक्ष
ना.म.प्र.वि.प्रा.

| | | |
|---|---|---|
| ६ | अनधिकृत बांधकाम निर्मूलन विभाग | १० |
| ७ | जमीन व मालमत्ता विभाग | ०६ |
| ८ | लेखा व वित्त विभाग | ०८ |
| ९ | अग्निशमन विभाग | ०७ |
| १० | प्रकल्प विभाग | ०७ |
| ११ | महिती व जनसंपर्क विभाग | ०२ |
| १२ | महिती व तंत्रज्ञान विभाग | ०३ |
| १३ | यंत्रसामग्री (मशीनरी) | ०३ |
| १४ | विद्युत विभाग | ०५ |
| १५ | विधी विभाग | ०५ |
| १६ | दक्षता व गुणनियंत्रक | ०२ |
| | एकुण | १५६ |

४.६ सदर प्रस्तावित १५६ पदांमध्ये गट अ संवर्गातील ४४ पदे, गट ब संवर्गातील ४० पदे गट क संवर्गातील ७२ पदे व गट ड संवर्गातील ०० पदे प्रस्तावित करण्यात आलेली आहे. तसेच गट ड संवर्गातील सर्व पदे ही बाह्यस्त्रोताद्वारे भरण्यात येणार असल्याचे महानगर आयुक्त यांनी बैठकी दरम्यान सांगितले.

४.७ सादर केलेल्या विषयावर चर्चा झाली व त्यानंतर विचार होऊन खालील प्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव क्र. ४/१०/२०/१०/२०२५ : "असा ठराव करण्यात येत आहे की, महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कायदा २०१६ चे कलम १२ (३) प्रमाणे नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या १५६ पदांचा सुधारीत आकृतीबंधाचा प्रस्ताव शासनाचे मान्यतेस्तव पाठविण्यास प्राधिकरणाची मंजूरी प्रदान करण्यात येत आहे."

विषय क्र. ५/१०/२०/१०/२०२५

**नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण कार्यालयातील अधिकारी/कर्मचारी वर्ग यांना नगर विकास विभागाअंतर्गत असणाऱ्या विविध महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, महानगरपालिका इ. कार्यालयामध्ये समकक्ष पदावर प्रतिनियुक्तीने / बदलीने पाठविण्याबाबत.**

५.१ सदर प्रस्तावाबाबत महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, प्राधिकरणद्वारे शासनाला १५६ पदांचा आकृतीबंध मान्यतेसाठी पाठविण्यात येत आहे. प्रत्येक प्राधिकरण हे स्वतः नियुक्ती प्राधिकारी अधिकारी असल्याने प्रतिनियुक्तीवरील अधिकारी वगळता इतर अधिकारी व कर्मचारी यांचे बदलीचे तसेच प्रतिनियुक्तीचे कोणतेही धोरण सध्या अस्तीत्वात नाही.

५.२ नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण हे राज्य शासनाच्या नगर विकास विभागातंर्गत कार्यरत असून, यावर नगर विकास विभाग व सामान्य प्रशासन विभाग यांचे नियंत्रण आहे. याशिवाय नगर विकास विभागाच्या अधिनस्त राज्यातील विविध महानगरपालिका, महानगर विकास प्राधिकरणे इत्यादी कार्यालयामध्ये आस्थापना कार्यरत आहेत.

| | |
|---|---|
| महानगर आयुक्त<br>ना.म.प्र.वि.प्रा. | मा. अध्यक्ष<br>ना.म.प्र.वि.प्रा. |

५.३ सदर प्रस्तावाद्वारे नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण यांच्या आस्थापनेवर कार्यरत असणारा कोणताही वर्ग–१, वर्ग–२, वर्ग–३ चा अधिकारी/कर्मचारी वर्ग ज्याची या प्राधिकरणाच्या आस्थापनेवर किमान ५ वर्ष सेवा झाली आहे, तो प्रतिनियुक्तीने / बदलीस पात्र असेल व एकुण पदसंख्येच्या ५ टक्के पेक्षा जास्त असणार नाही इतक्या मर्यादित यांच्या प्रतिनियुक्तीने / बदली नगर विकास विभागाच्या अखत्यारीत असणा–या राज्यातील इतर महानगर प्राधिकरणे, महानगर पालिका, महानगर विकास प्राधिकरणे इ. कार्यालयामध्ये करण्याचे प्रस्तावित करण्यात येत असल्याचे महानगर आयुक्त यांनी बैठकीत सांगितले.

५.४ सादर केलेल्या विषयावर चर्चा झाली व त्यानंतर विचार होऊन खालील प्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

ठराव क्र. ५/१०/२०/१०/२०२५ : **"असा ठराव करण्यात येत आहे की,** नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या आस्थापनेवर कार्यरत असलेले वर्ग–१, वर्ग–२ व वर्ग–३ चे अधिकारी/कर्मचारी, ज्यांनी प्राधिकरणाच्या आस्थापनेवर किमान ५ वर्षांची सेवा पूर्ण केली आहे, यांना प्रतिनियुक्ती/बदलीस पात्र ठरविण्यात यावे. अशा प्रतिनियुक्ती/बदलीची मर्यादा एकूण पदसंख्येच्या ५ टक्क्यांपेक्षा अधिक नसावी. या अधिकारी/कर्मचाऱ्यांची प्रतिनियुक्ती/बदली नगर विकास विभागाच्या अखत्यारीतील राज्यातील इतर महानगर प्राधिकरणें, महानगरपालिका इत्यादी कार्यालयामध्ये समकक्ष पदावर करण्याबाबतचा सदर प्रस्ताव शासनास पाठविण्याबाबत प्राधिकरणाची मंजूरी प्रदान करण्यात येत आहे."

विषय क्र :– ०६ /१०/२०/१०/२०२५

**Amendment in The Nagpur Metropolitan Region Development Authority (Disposal of Lands) Regulations, 2019.**

६.१ सदर प्रस्तावाबाबत महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे (Disposal of Lands) Regulations, 2019 हे सन २०१९ मध्ये शासनाचे नगर विकास विभागा मार्फत मंजूर करण्यात आलेले आहेत.

६.२ सदर नियमावलीतील नियम क्र. ६-**Disposal of land for Commercial, Residential, Industrial purpose, PART-III Manner of Disposal of land** मध्ये उपनियम ६ हा खालीलप्रमाणे समाविष्ट करण्याचे प्रस्तावित आहे.

"In case if agricultural land acquired through consent as per Government Act/Government Resolution/Rules, every original owner/owners will be eligible for upto 140.0 Sq. Mt. Commercial/Residential/Industrial plot for every Acre land acquired by the Authority at the rate of Rs. 100 for a period specified in PART-V in The Nagpur Metropolitan Region Development Authority (Disposal of Lands) Regulations, 2019. Further, if the land holding of original owner/owners is not absolute, then the rounding off will take place of agricultural land and the differential amount of additional plot area, if applicable, will be chargeable as per double the prevailing ready reckoner rate."

महानगर आयुक्त
ना.म.प्र.वि.प्रा.

मा. अध्यक्ष
ना.म.प्र.वि.प्रा.

६.३ सादर केलेल्या विषयावर चर्चा झाली व त्यानंतर विचार होऊन खालील प्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र. ६/१०/२०/१०/२०२५ :** "असा ठराव करण्यात येत आहे की, To amend rule 6 of Nagpur Metropolitan Region Development Authority (Disposal of Lands) Regulations, 2019 by adding sub rule (6) and these rules may be called Nagpur Metropolitan Region Development Authority (Disposal of Lands) (Amendment) rules 2025."

सदर प्रस्ताव शासनाचे मान्यतेस्तव पाठविण्यास प्राधिकरणाची मंजूरी प्रदान करण्यात येत आहे.

**विषय क्र : ०७/१०/२०/१०/२०२५**

**मौजा इंदोरा, नागपूर येथील कामठी रोड लगत डॉ. बाबासाहेब आंबेडकर कन्व्हेशन सेंटरचे बांधकामाच्या कंत्राटराशीत होणाऱ्या वाढीस मंजूरी मिळण्याबाबत.**

७.१ सदर प्रस्तावाबाबत महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, शासन निर्णयानूसार मौजा इंदोरा येथील कामठी रोड लगत डॉ. बाबासाहेब आंबेडकर कन्व्हेशन सेंटर, नागपूर येथील बांधकामाकरीता शासन निर्णय दिनांक ११.०९.२०१४ अन्वये रू. ११३.७४ कोटी इतक्या खर्चास प्रशासकिय मान्यता प्रदान करण्यात आलेली आहे. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर कन्व्हेंशन सेंटरचे उर्वरीत कामे पूर्ण करण्याकरीता फेज–२ अंतर्गत रू. १४.९४ कोटीला प्रशासकीय मान्यता शासन निर्णय दिनांक १४.११.२०२२ अन्वये मंजूरी प्राप्त झालेली आहे. तसेच शासन निर्णय दिनांक २७.०२.२०२४ अन्वये प्रशासकीय मान्यतेच्या व्यतीरीक्त वस्तु व सेवा कर (GST) रू. ८.६८ कोटी व डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ४० फुट उंचीच्या पुतळयाच्या कामाकरीता अतिरीक्त रू. २.८१ कोटीच्या खर्चास मान्यता देण्यात आली आहे.

७.२ उक्त प्रकल्पामध्ये असे एकूण रू. १४०.१७ कोटी निधी नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला वेळोवेळी प्रदान करण्यात आला आहे.

७.३ नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण/ नागपूर सुधार प्रन्यासव्दारे निविदा क्र. १ दिनांक १३.१०.२०१४ अन्वये मौजा इंदोरा, नागपूर येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर कन्व्हेशन सेंटरच्या बांधकामाकरीता कंत्राटदार मे. डी ठक्कर कंस्ट्रक्शन प्रा. लि. यांना दि. २०.०६.२०१५ च्या पत्रान्वये रू. ८३.५७ कोटीचे कार्यादेश देण्यात आलेला होता. तदनंतर शासन निर्णय दिनांक १४.११.२०२२ अन्वये उक्त कंत्राटदार वाढ करून सुधारीत कंत्राट रू. ८७.५७ कोटी करण्यात आले.

तदनंतर याच कंत्राटामधील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा ४० फुट उंचीच्या ब्राझच्या कास्टींग करीता येणाऱ्या मुळ प्रशासकीय मान्यता रू. ११३.७४ कोटी व्यतिरिक्त रू. २.८१ कोटीचे अतिरीक्त खर्चाचा प्रस्ताव शासनास सादर करण्यात आला असून सदर प्रस्तावास दिनांक २७.०२.२०२४ रोजी अतिरीक्त खर्चास मान्यता प्राप्त आहे. तसेच सदर काम याच कंत्राटदाराव्दारे करण्याकरीता दिनांक ०६.०५.२०२४ रोजी बैठकीमध्ये समाज कल्याण विभगामार्फत मान्यता प्राप्त असल्याचे महानगर आयुक्त यांनी बैठकीस सांगितले.

महानगर आयुक्त
ना.म.प्र.वि.प्रा.

मा. अध्यक्ष
ना.म.प्र.वि.प्रा.

७.३ तसेच सदर पुतळ्याचे काम प्रगतीपथावर असून, सदर प्रकरणी मुळ कंत्राटराशी रू. ८३.५७ कोटी मध्ये रू. ६.९१ कोटीची वाढ होत असून सुधारीत कंत्राटराशी कंत्राट रू. ९०.४८ कोटी होत आहे. यापूर्वीचे प्राधिकरणाचे ठराव क्र. १०/०६ दिनांक २०.०८.२०१८ अन्वये कंत्राटराशीमध्ये होत असलेल्या वाढ करीता अधिकार रू. ५.०० कोटीच्यावर प्राधिकरणाला आहे. तेव्हा सदर प्रकरणी कंत्राटामध्ये रू. ६.९१ कोटीची वाढ होत असल्यामुळे याबाबत कामाची कार्योत्तर मंजूरी प्राधिकरणा मार्फत घेण्याकरीता सदर प्रस्ताव प्राधिकरणाच्या बैठकीत ठेवण्यात येत आहे.

७.४ सादर केलेल्या विषयावर चर्चा झाली तसेच चर्चे दरम्यान मा. अध्यक्ष यांनी सुचित केले की समाज कल्याण विभागाने सदर डॉ. बाबासाहेब आंबेडकर कन्व्हेशन सेंटरच्या व्यवस्थापनाची जबाबदारी खाजगी संस्थेस सोपवावी. व त्यानूसार सदर विषयावर विचार होऊन खालील प्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र. ७/१०/२०/१०/२०२५ :** **"असा ठराव करण्यात येत आहे की,** निविदा क्र. १, दिनांक १३.१०.२०१४ मौजा इंदोरा, नागपूर येथील कामठी रोड लगत डॉ. बाबासाहेब आंबेडकर कन्व्हेंशन सेंटर बांधकामास मुळ कंत्राटराशी रू. ८३.५७ कोटी मध्ये रू. ६.९१ कोटीची वाढ होत असून सुधारीत कंत्राटराशी रू. ९०.४८ कोटी होते. सदर कंत्राटात रू. ६.९१ कोटीच्या वाढीला शासनाची मंजूरी प्राप्त असून या वाढीला प्राधिकरणाची कार्योतर मंजूरी प्रदान करण्यात येत आहे."

**"पुढे असाही ठराव करण्यात येत आहे की,** सदर डॉ. बाबासाहेब आंबेडकर कन्व्हेशन सेंटरच्या व्यवस्थापनाची जबाबदारी समाज कल्याण विभागाने खाजगी संस्थेस सोपवावी."

**विषय क्र. : ०८/१०/२०/१०/२०२५ : दिक्षाभूमी, नागपूर येथे करण्यात येत असलेल्या विकास कामामध्ये भूमीगत उपक्रम व अन्य भूमीगत कामांसाठी खोदकाम करून अंशत: बांधकाम केलेल्या जागेचे सपाटीकरण करण्याकरीता केलेल्या खर्चास मंजूरी प्रदान करण्याबाबत.**

८.१ सदर प्रस्तावाबाबत महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, परमपुज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती, दिक्षाभूमी नागपूर यांनी दिक्षाभूमी येथे येणाऱ्या भाविकांसाठी सोई–सुविधा निर्माण करण्याबाबत व या जागेच्या सर्वसमावेशक विकासासंबंधी वेळोवेळी केलेल्या विनंतीनुसार तसेच शासनाने वेळोवेळी दिलेल्या निर्देशानुसार वास्तुविशारद मे. डिझाईन असोशिएट इनकॉर्पोरेशन यांनी तयार केलेला रू. २००.३१ कोटीच्या आराखडयास शासनाने दिनांक ३१/०३/२०२३ रोजीच्या शासन निर्णयान्वये प्रशासकीय मान्यता प्रदान केल्याने निविदा प्रकिया राबवून कंत्राटदार, मे. वाय.एफ.सी.–बी.बी.जी. (जे.व्ही.) यांना दिनांक २०.१०.२०२३ रोजी कंत्राटराशी रू. १३०,८१,९६,७३८/– साठी कार्यादेश प्रदान करण्यात आला. त्यानुषंगाने कंत्राटदाराने मौक्यावर प्रकल्पातील प्रस्तावित बाबीपैकी संरक्षण भिंत, व्यासपिठ, बेसमेंट पार्किंग इत्यादी कामे सुरू करण्यात आली होती.

८.२ परमपुज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती, दिक्षाभूमी नागपूर यांनी दि. ०१.०७.२०२४ रोजी प्रकल्प स्थळी प्रकल्पातील भूमीगत बांधकामाविरूध्द तीव्र जनक्षोभ लक्षात घेता प्रकल्पातील भूमीगत उपक्रम रद्द करण्याची विनंती केली. सोबतच

| | |
|---|---|
| महानगर आयुक्त<br>ना.म.प्र.वि.प्रा. | मा. अध्यक्ष<br>ना.म.प्र.वि.प्रा. |

दि. ०१/०७/२०२४ रोजी मा. उपमुख्यमंत्री (गृह) महोदयांनी मुंबई, येथे सुरू असलेल्या पावसाळी अधिवेशनादरम्यान विधानसभेच्या सभागृहात दिक्षाभूमी परिसरात सुरू असलेल्या विकास कामास तात्पुरती स्थगिती देण्यात येत असल्याबाबतची व सदर प्रकल्पा संबंधाने समितीसोबत बैठक आयोजित करून पुढील निर्णय घेण्यात येईल अशी घोषणा केली.

८.३ समितीच्या विनंती वरून महानगर आयुक्त, नामप्रविप्रा यांचे अध्यक्षतेखाली दिनांक ०६/०७/२०२४ रोजी संपन्न बैठकीतील चर्चेनुसार परमपुज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीने अध्यक्ष, सचिव व इतर सभासदांच्या स्वाक्षरीसह दिनांक ०८/०७/२०२४ रोजी पत्र सादर केले आहे. या पत्रात दिक्षाभूमी परिसरात खोदकाम करण्यात आलेल्या भूमीगत वाहनतळ व अन्य भूमीगत कामे तात्काळ बंद करून खोदलेल्या कामाचे सपाटीकरण करून परिसर पूर्ववत करून द्यावा, जेणेकरून अशोका विजयादशमी दिनी येणाऱ्या अनुयायांना त्रास होणार नाही, अशी विनंती केली होती. त्याअनुषंगाने सदर प्रकल्पात खालीलप्रमाणे प्रस्ताव सादर आहे.

८.४ भूमीगत वाहनतळाचे कामाकरीता खोदकाम करण्यात आले असून त्यावर या वाहनतळाच्या पायव्याकरीता पी.सी.सी., राफ्ट व वॉटरप्रुफिंग व या भूमीगत वाहनतळाच्या क्षेत्राच्या सुरक्षेसाठी कॉंक्रिटची सुरक्षा भिंतीचे बांधकामावर रू. २१/– कोटी व या खोदकाम केलेल्या जागेचे सपाटीकरणाकरीता झालेल्या रू ३.६७/– कोटी असे एकूण रू. २४.६७/– (वस्तु व सेवा कर आणि पर्यवेक्षण शुल्काव्यतिरीक्त) खर्चास मंजूरी प्रदान करावी. **जागा पूर्ववत करण्याचे काम स्थापत्य अभियांत्रिकी विभाग, व्हि. एन. आय.टी., नागपूर यांनी सुचविलेल्या कार्यपद्धतीनुसार व त्यांचे देखरेखीखाली पूर्ण करण्यात आले.** तसेच धम्मचक्र प्रवर्तन दिनी मुख्य कार्यक्रमात अडचण निर्माण होवू नये म्हणून स्टेजचे काम विशिष्ट पातळीपर्यंत पूर्ण करून सदर परिसर व स्टेज दिनांक १२/१०/२०२४ रोजी संपन्न झालेल्या धम्मचक्र प्रवर्तन दिनापूर्वी समितीस हस्तांतरीत करण्यात आले.

८.५ सादर केलेल्या बाब टिपणीवर तसेच परिशिष्टावरील मजकुरावर चर्चा झाली व चर्चे दरम्यान मा. पालकमंत्री, नागपूर जिल्हा तथा सदस्य, नामप्रविप्रा यांनी सुचित केले की उर्वरीत रक्कम खर्च करण्याबाबत परमपुज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती, दिक्षाभूमी नागपूर यांचे समवेत बैठक घ्यावी व त्यानुसार उर्वरीत रक्कम खर्च करण्याबाबत कार्यवाही करावी व त्यानूसार सदर विषयावर विचार होऊन खालील प्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र. ८/१०/२०/१०/२०२५ :** "असा ठराव करण्यात येत आहे की, दिक्षाभूमी, नागपूर येथे करण्यात येत असलेल्या विकासकामाबाबत दिनांक ०१.०७.२०२४ रोजी प्रकल्पस्थळी प्रकल्पातील भुमीगत बांधकामा विरूध्द तिव्र जनआंदोलन उभारले असल्याने सदर कामे तात्काळ बंद करण्यात आली. याबाबत अनुयायी समुदायाच्या तसेच प. पू. डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समितीचे अध्यक्ष, सचिव व इतर सदस्यांच्या स्वाक्षरीसह दिनांक ०८.०७.२०२४ रोजीच्या प्राप्त झालेल्या निवेदनाच्या मागणीप्रमाणे, दिक्षाभूमी परिसरात करण्यात आलेले भूमीगत वाहनतळ पुर्ववत

महानगर आयुक्त
ना.म.प्र.वि.प्रा.

मा. अध्यक्ष
ना.म.प्र.वि.प्रा.

करण्यासाठी या परिसराचे सपाटीकरण करण्यात आले, यासाठी आलेला एकूण खर्च रू. २४.६७ कोटी + वस्तु व सेवाकर + पर्यवेक्षण शुल्क इत्यादी खर्चास मंजूरी प्रदान करण्यात येत आहे.''

''**पुढे असाही ठराव करण्यात येत आहे की,** परमपुज्य डॉ. बाबासाहेब आंबेडकर स्मारक समिती, दिक्षाभूमी नागपूर यांचे समवेत बैठक घेऊन, त्यानुसार उर्वरीत रक्कम खर्च करण्याबाबत कार्यवाही करावी, असा ठराव पारित करण्यात आला.''

**विषय क्र. ९/१०/२०/१०/२०२५ नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या क्षेत्रामध्ये इंडस्ट्रीअल कॉरीडॉर (Industrial Corridor) विकसीत करणे व प्रकल्पाची तांत्रिक आणि आर्थिक व्यवहार्यता तपासण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) नियुक्त करण्याबाबत.**

९.१ सदर प्रस्तावाबाबत महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, या प्राधिकरणामार्फत नागपूर शहराभोवती बाहय वळण रस्ता प्रस्तावित करण्यात येत आहे. याला नगर विकास विभाग शासन निर्णय क्रमांक. एमआरडी–३३२५/प्र.क्र.४९/नवि–३५, दिनांक. १०.०९.२०२५ अन्वये शासनाने तत्वत: मान्यता दिलेली आहे.

९.२ नागपूर शहराचा वेगाने होणारा नागरीकरणाचा विस्तार, औद्योगिक उत्पादनात होत असलेली वाढ, तसेच मध्य व पश्चिम भारतातील नागपूरचे व्यापारी आणि दळणवळणातील महत्त्व अधिक क्षमतेने वाढत आहे. तसेच नागपूर जिल्हयाच्या पुर्वेस असलेले गडचिरोली हे स्टील उद्योगाचे मोठे उत्पादन केंद्र बनत असून पूर्व विदर्भ हा अतिशय महत्वाच्या खनिजांनी समृध्द असा प्रदेश असल्याने, या खनिजांवर आधारीत उद्योगाच्या निर्मीतीकरीता इंडस्ट्रीअल कॉरीडॉर (Industrial Corridor) निर्माण करणे आवश्यक आहे.

९.३ या करीता प्राधिकरणाचे कार्यक्षेत्रामध्ये औद्योगीक विकास साधणेस्तव इंडस्ट्रीअल कॉरीडॉर (Industrial Corridor) निर्माण करण्याच्या शक्यता पडताळणे व याबाबत प्रकल्पाची आर्थिक आणि तांत्रिक व्यवहार्यता तपासण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC - Project Management Consultant) नियुक्त करणे आवश्यक असल्याचे चर्चे दरम्यान सांगण्यात आले.

९.४ सादर केलेल्या विषयावर चर्चा झाली व चर्चे दरम्यान मा. अध्यक्ष यांनी सुचित केले की सदर विषयाशी संबंधित सक्षम प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार समिती (PMC) स्थापन करावी व त्यानूसार सदर विषयावर विचार होऊन खालील प्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र. ९/१०/२०/१०/२०२५ : ''असा ठराव करण्यात येत आहे की,** नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या क्षेत्रामध्ये इंडस्ट्रीअल कॉरीडॉर (Industrial Corridor) विकसीत करणे व प्रकल्पाची तांत्रिक आणि आर्थिक व्यवहार्यता तपासण्यासाठी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) नियुक्त करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे.''

''**पुढे असाही ठराव करण्यात येत आहे की,** वरील ठरावाची अंमलबजावणी करण्यासंबंधी आवश्यक ती पुढील सर्व कार्यवाही करण्यास महानगर आयुक्त यांना याद्वारे प्राधिकृत करण्यात येत आहे.''

महानगर आयुक्त<br>ना.म.प्र.वि.प्रा.

मा. अध्यक्ष<br>ना.म.प्र.वि.प्रा.

**विषय क्र. १०/१०/२०/१०/२०२५ : नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या हद्दीतील सर्व प्रकारच्या जमिनी व इमारती यांच्या खरेदी–विक्री व्यवहारावर आकारण्यात येणाऱ्या मुद्रांक शुल्काव्यतिरीक्त २ टक्के अतिरिक्त उपकर लागू करण्याबाबत.**

१०.१ सदर प्रस्तावाबाबत महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, महाराष्ट्र शासन अधिसुचना दि. ०४ मार्च २०१७ अन्वये नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाची स्थापना करण्यात आलेली असून, या क्षेत्रामध्ये प्राधिकरण पायाभुत सुविधांचे महत्वाकांक्षी प्रकल्प राबवत असून, **नियोजीत बाहयवळण रस्ता व नविन नागपूर हे मोठ्या स्वरूपाचे प्रकल्प प्रस्तावित आहेत.** या प्रकल्पासाठी भुसंपादन प्रक्रिया पार पाडणे व प्रत्यक्ष प्रकल्प विकसित करणे यासाठी प्राधिकरण हे HUDCO या अग्रगण्य वित्तिय संस्थेकडून कर्जाची उभारणी करत आहे तसेच भविष्यात विविध विकास प्रकल्प राबविण्यासाठी इतर वित्तीय संस्थाकडून देखील अर्थसहाय्य प्राप्त करावे लागू शकेल. सध्या नविन नागपूर व नागपूर बाहयवळण रस्ता या दोन्ही प्रकल्पासाठी प्राथमिक टप्प्यात अंदाजे रू. ११३००.०० कोटी इतके दायित्व प्राधिकरणावर निर्माण होत असून, **या कर्जाची परतफेड करणे व इतर प्रकल्प राबविणे यासाठी प्राधिकरणाकडे ठोस असे उत्पन्नाचे स्त्रोत असणे आवश्यक आहे.**

१०.२ या करीता प्राधिकरणाचे क्षेत्रातील जमिनी व इमारती यांच्या खरेदी–विक्रीच्या व्यवहारावर आकारण्यात येणाऱ्या मुद्रांक शुल्काव्यतिरीक्त २ टक्के अतिरिक्त उपकर आकारण्यास मान्यता मिळावी व हा निधी प्राधिकरणाला देण्यात यावा. सदर प्रस्ताव मान्य झाल्यास शासनाला मान्यतेस्तव सादर करण्यात येईल.

१०.३ याबाबत मा. अध्यक्ष यांनी सुचित केली की, २ टक्के अतिरिक्त उपकर आकारण्या एवजी १ टक्का अतिरिक्त उपकर आकारावा व सदर अतिरिक्त उपकराची रक्कम प्राधिकरणास उपलब्ध करून देण्यात यावी.

**ठराव क्र. १०/१०/२०/१०/२०२५ :** "असा ठराव करण्यात येत आहे की, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला उत्पन्नाचा ठोस व शाश्वत स्त्रोत उपलब्ध करण्याच्या दृष्टीने महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम, २०१६ च्या कलम ३१ प्रमाणे नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या हद्दीतील सर्व प्रकारच्या जमिनी व इमारती यांच्या खरेदी–विक्री व्यवहारावर आकारण्यात येणाऱ्या मुद्रांक शुल्काव्यतिरीक्त १ टक्के अतिरिक्त उपकर आकारण्यास व सदर अतिरिक्त उपकराची रक्कम प्राधिकरणास उपलब्ध करून देण्याबाबत प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे. त्याप्रमाणे सदर प्रस्ताव शासनाला मंजूरीस्तव सादर करण्यात यावा."

**विषय क्र. : ११/१०/२०/१०/२०२५ औद्योगिक आस्थापना व उद्योजका कडून कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलीटी (CSR) द्वारा प्राप्त निधीतून नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण क्षेत्रातील विकासाची विविध कामे करणे बाबत.**

११.१ सदर प्रस्तावाबाबत महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, सन २०१७ महाराष्ट्र अधिनियम खंड १३ नुसार महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे अधिकार व कार्य नमूद आहेत. त्यानुषंगाने प्राधिकरणाद्वारे विकासाची विविध कामे करण्यात येतात.

महानगर आयुक्त
ना.म.प्र.वि.प्रा.

मा. अध्यक्ष
ना.म.प्र.वि.प्रा.

११.२ तसेच कंपनी कायदयानुसार भारतीय उद्योगांना वार्षिक कमाईचा काही भाग CSR अंतर्गत खर्च करणे आवश्यक असून, उद्योजकांकडे CSR निधी अंर्तगत विकास व तत्सम कामे करण्याकरीता यंत्रणा नसल्याने, औद्योगिक कंपन्यांनी आपला CSR निधी या प्राधिकरणाला उपलब्ध करून दिल्यास, सदर CSR निधीतून प्राधिकरणाचे क्षेत्रामध्ये विकासाची विविध कामे करता येतील. तथापि, प्राधिकरणाच्या सन २०२५–२६ या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकामध्ये CSR निधी लेखा शिर्षाचा समावेश नाही. सन २०२५–२६ च्या अंदाजपत्रकामध्ये उत्पन्न बाजूने CSR निधी प्राप्त आणि खर्च बाजूने CSR निधीतून तत्सम कामे असे नविन लेखाशिर्ष तयार करणे आवश्यक आहे.

११.३ याबाबत चर्चा करण्यात आली व त्यानंतर प्राधिकरणाचे विचार होऊन खालीलप्रमाणे ठरावाला मान्यता देण्यात आली.

**ठराव क्र. ११/१०/२०/१०/२०२५ : "असा ठराव करण्यात येत आहे की,** औद्योगिक आस्थापना व उद्योजकांकडून कॉर्पोरेट सोशल रिस्पॉन्सिबिलीटी (CSR) द्वारा प्राप्त निधीतून नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या क्षेत्रातील विकासाची विविध कामे करण्यासाठी तसेच सन २०२५–२६ या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकामध्ये उत्पन्न बाजूने CSR निधी प्राप्त आणि खर्च बाजूने CSR निधीतून विकासाची विविध कामे असे नविन लेखाशिर्ष तयार करून त्याअंतर्गत तरतूद करण्यास वित्तीय मर्यादेच्या अधिन राहून प्राधिकरणाची मान्यता प्रदान करण्यात येत आहे"

विषय क्र. १२/१०/२०/१०/२०२५

**नविन नागपूर व नागपूर बाहयवळण रस्ता अंतर्गत भूसंपादनाच्या खर्चासाठी नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण व्दारा फिरता निधीची (Revolving Fund) तरतूद करण्याबाबत**

१२.१ सदर प्रस्तावाबाबत महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणद्वारा "नविन नागपूर" अंतर्गत मौजा–गोधणी (रिठी) व मौजा लाडगाव (रिठी), तह. हिंगणा जि. नागपूर येथील एकूण अंदाजे क्षेत्र ६९२.०६ हे आर जागा संपादित करून सार्वजनिक हितार्थ "International Business and Finance Centre" (IBFC) विकसीत करण्याच्या महत्वाकांक्षी प्रकल्प राबविण्यास शासन निर्णय दि. १०.०९.२०२५ अन्वये तत्वत: मान्यता प्रदान केलेली आहे.

१२.२ सदर प्रकल्पाकरिता ६९२.०६ हे. आर. जागा संपादित करण्यासाठी अंदाजित रू. ३००० कोटी व सदर संपादित जागेमध्ये "नविन नागपूर" विकसीत करण्याकरिता अंदाजित रू. ३५०० कोटी असा एकूण रू. ६५०० कोटी खर्च अपेक्षित असून, सदर प्रकल्प हा प्राधिकरणाद्वारा स्वय: शाश्वत (Self Sustainable) पध्दतीने राबवायचा आहे. सदर प्रकल्पाच्या खर्चासाठी प्राधिकरणाने गृहनिर्माण नागरी विकास महामंडळ लि. (HUDCO) या भारत सरकारच्या वित्तिय संस्थेकडून एकूण रू. ६५०० कोटीचे कर्ज उभारण्यास शासनाने मान्यता प्रदान केलेली आहे.

१२.३ तसेच "नविन नागपूर" प्रकल्पासाठी भूसंपादनाची कामे सूरू झालेली असून त्याकरीता निधीची तात्काळ आवश्यकता आहे. गृहनिर्माण नागरी विकास महामंडळ लि. (HUDCO) ने रू. ३००० कोटी कर्ज मंजुर केलेले असून अद्याप गृहनिर्माण नागरी विकास महामंडळ लि.

महानगर आयुक्त
ना.म.प्र.वि.प्रा.

मा. अध्यक्ष
ना.म.प्र.वि.प्रा.

(HUDCO) कडून भूसंपादनासाठी कर्जाची रक्कम अप्राप्त आहे. त्यामूळे सदर प्रकल्पासाठी आवश्यक रक्कम तात्काळ उपलब्ध होण्याच्या दृष्टीने नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाद्वारे भूसंपादनाच्या कामासाठी फिरता निधी (Revolving Fund) चे स्वतंत्र खात्यामध्ये रक्कम जमाकरून भूसंपादनाचा खर्च करण्यात येईल. गृहनिर्माण नागरी विकास महामंडळ लि. (HUDCO) कडून कर्जाची रक्कम प्राप्त झाल्यास सदर खर्चाची रक्कम समायोजित करण्यात येईल, असे सांगितले.

१२.४ सादर केलेल्या बाब टिपणीवर तसेच परिशिष्ठावरील मजकुरावर चर्चा झाली व त्यानंतर प्राधिकरणाचा विचार होऊन खालीलप्रमाणे ठरावाला मान्यता देण्यात आली.

**ठराव क्र. १२/१०/२०/१०/२०२५ :** "असा ठराव करण्यात येत आहे की, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाव्दारा नियोजित नविन नागपूर व नागपूर बाहयवळण रस्ता या प्रकल्पांच्या भूसंपादनाच्या कामासाठी "फिरता निधी (Revolving Fund)" स्वतंत्र खात्यामध्ये रक्कम जमाकरून भूसंपादनाचा खर्च करण्यास आणि गृहनिर्माण नागरी विकास महामंडळ लि. (HUDCO) कडून कर्जाची रक्कम प्राप्त झाल्यावर सदर खर्चाची रक्कम समायोजित करण्यास मंजूरी प्रदान करण्यात येत आहे."

विषय क्र. १३/१०/२०/१०/२०२५

**नागपूर महानगर प्रदेश क्षेत्राकरीताचे नियोजनबध्द विकास होण्याचे दृष्टीने मंजूर विकास योजनेमध्ये आवश्यकतेनुरूप प्रस्तावित रस्त्याचे सरेंखनामध्ये बदल करणे, प्रस्तावित रस्त्याच्या रूंदीमध्ये बदल करणे, अनावश्यक रस्ते वगळणे व नविन रस्ते प्रस्तावित करणेस्तव, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अंतर्गत ठराव घेण्याचे व प्रस्ताव शासनास सादर करण्यापर्यंतची कार्यवाही करण्याबाबत, उक्त अधिनियमाचे कलम १५१ व महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम–२०१६ चे कलम ४३ अन्वयेचे तरतुदीनुसार खालीलप्रमाणे अधिकार प्रत्यायोजन करण्याबाबत.**

१३.१ सदर प्रस्तावाबाबत महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, नागपूर महानगर क्षेत्राची विकास योजना दिनांक ०५/०१/२०१८ अन्वये मंजूर झालेली आहे.

१३.२ नागपूर महानगर प्रदेश क्षेत्रामध्ये नियोजनबध्द विकास होण्याचे दृष्टीने मंजूर विकास योजनेमध्ये आवश्यकतेनुरूप प्रस्तावित रस्त्यांचे सरेंखनामध्ये बदल करणे, प्रस्तावित रस्त्यांच्या रूंदीमध्ये बदल करणे, अनावश्यक रस्ते वगळणे व नविन रस्ते प्रस्तावित करणेस्तव, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करताना सदर प्रस्ताव हे प्राधिकरणाचे बैठकीत सादर केले जातात.

१३.३ सबब, सुलभतेच्या दृष्टीने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अंतर्गत ठराव घेण्याचे व प्रस्ताव शासनास सादर करण्यापर्यंत करावयाचे कार्यवाहीचे अधिकार उक्त अधिनियमाचे कलम १५१ व महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम–२०१६ चे कलम ४३ अन्वयेचे तरतुदीनुसार प्रदान करण्याचे प्रस्तावित आहे.

१३.४ सादर केलेल्या बाब टिपणीवर तसेच परिशिष्ठावरील मजकुरावर चर्चा झाली. तसेच चर्चे

महानगर आयुक्त
ना.म.प्र.वि.प्रा.

मा. अध्यक्ष
ना.म.प्र.वि.प्रा.

दरम्यान अपर मुख्य सचिव, नगर विकास विभाग यांनी सांगितले की सदर प्रमाणे सर्व प्राधिकरणास कलम ३७ अंतर्गत ठराव घेण्याचे अधिकार प्रत्यायोजीत केल्यास सदर कार्यवाही ही तातडीने पुर्ण होऊ शकेल.

१३.५ सदर विषयावर प्राधिकरणाचे विचार होऊन खालीलप्रमाणे ठरावाला मान्यता देण्यात आली.

ठराव क्र. १३/१०/२०/१०/२०२५ : "असा ठराव करण्यात येत आहे की, नागपूर महानगर प्रदेश क्षेत्राकरीताचे नियोजनबध्द विकास होण्याचे दृष्टीने मंजूर विकास योजनेमध्ये आवश्यकतेनुरूप प्रस्तावित रस्त्याचे संरेखनामध्ये बदल करणे, प्रस्तावित रस्त्याच्या रूंदीमध्ये बदल करणे, अनावश्यक रस्ते वगळणे व नविन रस्ते प्रस्तावित करणेस्तव, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अंतर्गत ठराव घेण्याचे व प्रस्ताव शासनास सादर करण्यापर्यंतची कार्यवाही करण्याबाबत, उक्त अधिनियमाचे कलम १५१ व महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम–२०१६ चे कलम ४३ अन्वयेचे तरतुदीनुसार खालीलप्रमाणे अधिकार प्रत्यायोजीत करण्यात येत आहे."

| विकास योजनेनुसार प्रस्तावित रस्त्याची लांबी | प्रदान करणेत येणारे अधिकार |
|---|---|
| ५.० कि.मी. पर्यंत | महानगर आयुक्त, ना.म.प्र.वि.प्रा |
| ५.० कि.मी. पेक्षा अधिक व २५.० कि.मी. पर्यंत | कार्यकारी समिती (Executive Committee) |
| २५.० कि.मी. पेक्षा अधिक | ना.म.प्र.वि.प्रा (NMRDA) |

विषय क्र. १४/१०/२०/१०/२०२५ : **नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाद्वारा "नविन नागपूर" अंतर्गत मौजा–गोधणी (रिठी) व मौजा लाडगांव (रिठी), तह. हिंगणा जि. नागपूर येथील एकूण अंदाजे क्षेत्र ६९२.०६ हे.आर जमीन संपादित करून "वाणिज्य क्षेत्र" विकसीत करण्याच्या प्रस्तावित प्रकल्पाला, मंजूर विकास योजनेनुसार उत्तर दिशेकडील मौजा किरमिटी या महसूली गावामधून विद्यमान ६०.० मी. रूंद वळण रस्त्यास मिळणारा उत्तर–दक्षिण ३६.० मी. प्रस्तावित विकास योजना रस्त्यास दुतर्फा रूंदीकरण प्रस्तावित करून ३६.० मी. ऐवजी ६०.० मी. प्रस्तावित करणेस्तव, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाबाबत.**

१४.१ सदर प्रस्तावाबाबत महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, नागपूर महानगर क्षेत्राची विकास योजना दिनांक ०५/०१/२०१८ अन्वये मंजूर झालेली आहे.

१४.२ नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाद्वारा "नविन नागपूर" अंतर्गत मौजा–गोधणी (रिठी) व मौजा लाडगांव (रिठी), तह. हिंगणा जि. नागपूर येथील एकूण अंदाजे क्षेत्र ६९२.०६ हे. आर जमीन संपादित करून "वाणिज्य क्षेत्र" विकसीत करणेस्तव, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ (१) अन्वये **'कृषी, अंशत: औद्योगिक व रस्ते'** ऐवजी **'वाणिज्य'** वापर बदलाबाबत प्राधिकरणाने परिचलन पध्दतीने मान्यता प्रदान केलेली आहे. त्याअनुषंगाने उक्त फेरबदलाची सुचना दैनिक वर्तमानपत्र लोकमत व हितवाद तसेच महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक २४/०६/२०२५ रोजी प्रसिध्द करण्यात आलेली आहे व त्यानूसार शासनास प्रस्ताव मंजूरीस्तव सादर करण्याबाबत पुढील कार्यवाही करण्यात येत आहे.

१४.३ सदर "नविन नागपूर" अंतर्गत "वाणिज्य क्षेत्र" या प्रकल्पाला नियोजनाच्या दृष्टीने मुख्य रस्त्यामधून सुलभपणे मार्गसुगमता प्राप्त होणेच्या दृष्टीने, मंजूर विकास योजनेनुसार उत्तर दिशेकडील मौजा किरमिटी या महसूली गावामधून विद्यमान ६०.० मी. रूंद वळण रस्त्यास मिळणारा उत्तर–दक्षिण ३६.० मी. प्रस्तावित विकास योजना रस्त्यास दुतर्फा रूंदीकरण प्रस्तावित करून ३६.० मी. ऐवजी ६०.० मी. प्रस्तावित करणेस्तव, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करावयाचे प्रस्तावित आहे.

१४.४ सादर केलेल्या विषयावर चर्चा झाली व चर्चे दरम्यान मा. अध्यक्ष यांनी सुचित केले की "नविन नागपूर" या प्रकल्पाचे बाहय वळण रस्त्याशी जोडण्याकरीता (Connectivity) मोठ्या रूंदीच्या रस्त्यांचे नियोजन करावे व त्यानूसार सदर विषयावर विचार होऊन खालील प्रमाणे ठराव पारित करण्यात आला.

**ठराव क्र. १४/१०/२०/१०/२०२५ : "असा ठराव करण्यात येत आहे की,** नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाद्वारा "नविन नागपूर" अंतर्गत मौजा–गोधणी (रिठी) व मौजा लाडगांव (रिठी), तह. हिंगणा जि. नागपूर येथील एकूण अंदाजे क्षेत्र ६९२.०६ हे.आर जमीन संपादित करून "वाणिज्य क्षेत्र" विकसीत करण्याच्या प्रस्तावित प्रकल्पाला, मंजूर विकास योजनेनुसार उत्तर दिशेकडील मौजा किरमिटी या महसूली गावामधून विद्यमान ६०.० मी. रूंद वळण रस्त्यास मिळणारा उत्तर–दक्षिण ३६.० मी. प्रस्तावित विकास योजना रस्त्यास दुतर्फा रूंदीकरण प्रस्तावित करून ३६.० मी. ऐवजी ६०.० मी. प्रस्तावित करणेस्तव, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदलाची कार्यवाही करण्यास मंजूरी प्रदान करण्यात येत आहे."

**"असाही ठराव करण्यात येत आहे की,** सदर फेरबदलाची अधिसुचना शासन राजपत्रात, दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करणे, त्यावर सुचना/हरकतीवर योग्य निर्णय घेऊन, तदनंतर त्यानुसार उक्त प्रस्ताव शासनास मंजूरीस्तवं सादर करण्याकरीता महानगर आयुक्त, नामप्रविप्रा यांना अधिकार प्रदान करण्यात येत आहे."

विषय क्र. १५ /१०/२०/१०/२०२५ :

**अ) नागपूर महानगर प्रदेश क्षेत्रामधील मौजा–गोधणी (रिठी) व मौजा लाडगांव (रिठी), तह. हिंगणा, जि. नागपूर येथील "नविन नागपूर" अंतर्गत वाणिज्य क्षेत्र जमीन संपादित करून विकसीत करण्याबाबत प्रस्तावाखालील जागेबाबत DPR (Detailed Project Report) नुसार जागेचे क्षेत्र व चतु:सिमा यामधील बदलाबाबत.**

**ब) प्रस्तावित १२०.० मी. रूंद बाहय वळण रस्ता (टप्पा–१ व टप्पा–२) चे सरेंखन (Alignment), मध्ये DPR (Detailed Project Report) नुसार होणाऱ्या बदलाबाबत. उपरोक्त प्रकरणात महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अंतर्गत ठराव घेण्याचे व प्रस्ताव शासनास सादर करण्यापर्यंतची कार्यवाही करण्याबाबत, उक्त अधिनियमाचे कलम १५१ व महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम–२०१६ चे कलम ४३ अन्वयेचे तरतुदीनुसार अधिकार प्रत्यायोजन करण्याबाबत.**

१५.१ सदर प्रस्तावाबाबत महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाद्वारा ''नविन नागपूर'' अंतर्गत मौजा–गोधणी (रिठी) व मौजा लाडगांव (रिठी), तह. हिंगणा येथिल संपूर्ण जागा संपादित करून सार्वजनिक हितार्थ ''वाणिज्य क्षेत्र'' विकसीत करण्याचा महत्वाकांक्षी प्रकल्प राबविण्यात येत असून, त्याअनुषंगाने उक्त जागा मंजूर विकास योजनेनुसार 'कृषी, अंशत: औद्योगिक व रस्ते' विभागातून वगळून 'वाणिज्य' विभागात समाविष्ट करणेस्तव, तसेच या व्यतिरिक्त नागपूर शहराचे दक्षिणेस व उत्तरेस प्रस्तावित १२०.० मी. रूंद अनुक्रमे टप्पा–१ व टप्पा–२ अंतर्गत ७५.० कि.मी. व ७३.० कि. मी. असे एकूण १४८.० कि. मी. लांबीचा बाह्य वळण रस्त्यास महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वयेचे फेरबदल प्रस्तावाबाबत प्राधिकरणाने ठरावास परिचलन पध्दतीने मान्यता प्रदान केलेली आहे.

१५.२ सदर प्रस्तावाच्या अनुषंगाने DPR (Detailed Project Report) तयार करतांना ''नविन नागपूर'' अंतर्गत ''वाणिज्य क्षेत्र'' या प्रस्तावाखालील क्षेत्रामध्ये तसेच प्रस्तावित १२०.० मी. रूंद बाहय वळण रस्ता (टप्पा–१ व टप्पा–२) चे संरेखनामध्ये बदल होण्याची शक्यता नाकारता येत नाही. त्यानुसार उक्त प्रस्तावाबाबत सत्वर कार्यवाही होणेस्तव व सुलभतेच्या दृष्टीने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अंतर्गत उक्त नमूदप्रमाणे स्थानांकनातील बदलाबाबत ठराव घेण्याचे व प्रस्ताव शासनास सादर करण्यापर्यंत करावयाचे कार्यवाहीचे अधिकार उक्त अधिनियमाचे कलम १५१ व महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम–२०१६ चे कलम ४३ अन्वयेचे तरतुदीनुसार प्रदान करण्याचे प्रस्तावित आहे.

१५.३ सदर विषयावर प्राधिकरणाचे विचार होऊन खालीलप्रमाणे ठरावाला मान्यता देण्यात आली.

ठराव क्र. १५/१०/२०/१०/२०२५ : ''असा ठराव करण्यात येत आहे की,

अ) नागपूर महानगर प्रदेश क्षेत्रामधील मौजा–गोधणी (रिठी) व मौजा लाडगांव (रिठी), तह. हिंगणा, जि. नागपूर येथील ''नविन नागपूर'' अंतर्गत वाणिज्य क्षेत्र जमीन संपादित करून विकसीत करण्याबाबत प्रस्तावाखालील जागेबाबत DPR (Detailed Project Report) नुसार जागेचे क्षेत्र व चतु:सिमा यामधील बदलाबाबत, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अंतर्गत ठराव घेण्याचे व प्रस्ताव शासनास सादर करण्यापर्यंतची कार्यवाही करण्याबाबत, उक्त अधिनियमाचे कलम १५१ व महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम–२०१६ चे कलम ४३ अन्वयेचे तरतुदीनुसार खालीलप्रमाणे अधिकार प्रत्यायोजीत करण्यात येत आहे.''

| उपरोक्त नमूद प्रमाणे प्रस्तावित फेरबदलाखालील जागेचे क्षेत्र | प्रदान करणेत येणारे अधिकार |
|---|---|
| ५०.० हे.आर पर्यंत | महानगर आयुक्त, ना.म.प्र.वि.प्रा |
| ५०.० हे.आर ते १००.० हे.आर पर्यंत | कार्यकारी समिती (Executive Committee) |
| १००.० हे.आर पेक्षा अधिक | ना.म.प्र.वि.प्रा (NMRDA) |

महानगर आयुक्त
ना.म.प्र.वि.प्रा.

मा. अध्यक्ष
ना.म.प्र.वि.प्रा.

"असाही ठराव करण्यात येत आहे की,

ब) प्रस्तावित १२०.० मी. रूंद बाहय वळण रस्ता (टप्पा–१ व टप्पा–२) चे संरेखन (Alignment), मध्ये DPR (Detailed Project Report) नुसार होणाऱ्या रस्त्याच्या स्थानांकनातील बदलाबाबत, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अंतर्गत ठराव घेण्याचे व प्रस्ताव शासनास सादर करण्यापर्यंतची कार्यवाही करण्याबाबत, उक्त अधिनियमाचे कलम १५१ व महाराष्ट्र महानगर प्रदेश विकास प्राधिकरण अधिनियम–२०१६ चे कलम ४३ अन्वयेचे तरतुदीनुसार अधिकार प्रत्यायोजीत करण्यात येत आहे."

**विषय क्र. १६/१०/२०/१०/२०२५ : नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण** मंजूर विकास योजनेतील मौजा–खसरमारी, तह. नागपूर (ग्रामीण), जि. नागपूर येथील ख.क्र. ४७/१, क्षेत्र २.६८ हे.आर. जागा "सार्वजनिक/निमसार्वजनिक" या विभागातून वगळून "रहिवास" विभागात महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणेबाबत.

१६.१ सदर प्रस्तावाबाबत महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, श्री. लक्ष्मीबाई चौधरी चॅरिटेबल ट्रस्ट यांनी मौजा–खसरमारी, तह. नागपूर (ग्रामीण), जि. नागपूर येथील ख.क्र. ४७/१, क्षेत्र २.६८ हे.आर. जागा "सार्वजनिक/निमसार्वजनिक" या विभागातून वगळून "रहिवास" विभागात समाविष्ट करणेस्तव, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करणेबाबत दि. १३/०२/२०२५ रोजीचा विनंती अर्ज प्राप्त असून, सदर प्रकरणी ७/१२ उताऱ्यानूसार मौजा–खसरमारी, तह. नागपूर (ग्रामीण), जि. नागपूर येथील ख.क्र.४७/१, क्षेत्र २.६८ हे.आर. ही जागा श्री. लक्ष्मीबाई चौधरी चॅरिटेबल ट्रस्ट यांचे नावे आहे.

१६.२ नागपूर महानगर प्रदेशाची विकास योजना दि. ०५/०१/२०१८ अन्वये मंजूर करण्यात आलेली असून, उक्त विकास योजनेनुसार मौजा–खसरमारी, तह. नागपूर (ग्रामीण) येथिल ख.क्र. ४७/१, क्षेत्र २.६८ हे.आर. ही जागा South-A अर्बन सेक्टर मध्ये स्थित असून "EP-188 नूसार, सार्वजनिक/निमसार्वजनिक (Public/Semi Public)" या विभागात समाविष्ट आहे.

१६.३ उक्त जागेचे पश्चिम हद्दीलगतच्या खसरा क्र. ४७/२ मौजा खसरमारी, तह. नागपूर (ग्रा.) या जागेमध्ये शैक्षणिक (College of Nursing & Hostel) या प्रयोजनार्थ अभिन्यास नकाशाला प्राधिकरणाद्वारे पत्र क्र. ६१८, दि. २६/०४/२०२२ अन्वये मंजूरी प्रदान केलेली आहे.

१६.४ उक्त जागा **सार्वजनिक/निमसार्वजनिक** (Public/Semi Public) या विभागातून वगळून रहिवास विभागामध्ये समाविष्ट करणेस्तव, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये फेरबदल करावयाचे प्रस्तावित आहे.

१६.५ सदर विषयावर प्राधिकरणाचे विचार होऊन खालीलप्रमाणे ठरावाला मान्यता देण्यात आली.

महानगर आयुक्त
ना.म.प्र.वि.प्रा.

मा. अध्यक्ष
ना.म.प्र.वि.प्रा.

ठराव क्र. १६/१०/२०/१०/२०२५ : "असा ठराव करण्यात येत आहे की,

| जागेचा तपशील | क्षेत्र (हे.आर.) | कलम ३१ (१) अन्वये मंजूर विकास योजनेनुसार प्रस्तावित वापर | कलम ३७ अन्वये करावयाचा फेरबदल |
|---|---|---|---|
| ख.क्र. ४७/१, मौजा–खसरमारी, तह. नागपूर (ग्रामीण) | २.६८ | "EP-188 नूसार, सार्वजनिक / निमसार्वजनिक (Public/Semi Public)" | रहिवास |

महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये उपरोक्त नमुद प्रमाणे फेरबदलाची कार्यवाही करण्यास मंजूरी प्रदान करण्यात येत आहे.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, सदर फेरबदलाची अधिसूचना शासन राजपत्रात, दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करणे, त्यावर सुचना/हरकतीवर योग्य निर्णय घेऊन, तदनंतर त्यानुसार उक्त प्रस्ताव शासनास मंजूरीस्तव सादर करण्याकरीता महानगर आयुक्त, नामप्रविप्रा यांना अधिकार प्रदान करण्यात येत आहे."

विषय क्र. १७/१०/२०/१०/२०२५ : विकास योजना–नागपूर महानगर क्षेत्र

**मौजा शिवा व सावंगा, तह. नागपूर (ग्रा.) जि. नागपूर येथील ११७.३३ हे.आर जमीन "कृषी" विभागातून वगळून "औद्योगिक (संरक्षण विभागास आवश्यक असणारे साहित्य व उपकरण निर्मिती करणेसाठी)" विभागात समाविष्ट करणेस्तव महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७ अंतर्गत फेरबदलाची कार्यवाही करणेबाबत.**

१७.१ सदर प्रस्तावाबाबत महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, उपरोक्त विषयास अनुसरून श्री. श्यामसुंदर मुंधडा, (DGM) इकॉनॉमिक एक्सप्लोझिव्ह प्रा. लि. नागपूर यांनी दि. १९/१०/२०२२ रोजी नगर विकास विभाग, महाराष्ट्र शासन यांना मौजा शिवा व सांवगा, तह. नागपूर (ग्रा) जि. नागपूर येथील ११५.१२ हे.आर जमीन **"कृषी"** विभागातून वगळून **"संरक्षण** (Defence Area)" विभागात समाविष्ट करणेबाबत केलेल्या विनंतीच्या अनुषंगाने शासनाने महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७ तरतुदीनुसार मंजूर विकास योजनेनुसारच्या विभाग बदलासंदर्भाने विहीत केलेली वैधानिक कार्यवाही पूर्ण करून शासनास परिपूर्ण फेरबदल प्रस्ताव सादर करण्याचे निर्देश दिलेले आहेत.

१७.२ अर्जदाराने शासनास सादर केलेल्या अर्जानुसार विषयांकित प्रस्तावांतर्गत तह. नागपूर (ग्रा.) येथील मौजा शिवा, खसरा क्र. ८०, ८९, ९०, ९२ तसेच मौजा सावंगा, ख. क्र. २०३, २०६, २०७, २११/१, २१३, २१४, २१५,२१६/२, २१६/३, २१७, २१८, २१९/१, २२० ब, २२२, २२३अ, २२३ब, २२४, २२५, २२६, २२७, २२८, २२९/१, २२९/२, २३०/१, २३०/२, २३१, २३२, २३४, २३५, २३६, २३७, २३८, २३९, २४१, २४२, २५९, २६०अ, २६०ब, ३२०, ३२१, ३२७, ३२९/१, ३२९/२, ३४१, २३३, २५४, २५५, २५६,

महानगर आयुक्त
ना.म.प्र.वि.प्रा.

मा. अध्यक्ष
ना.म.प्र.वि.प्रा.

२५७, २५८, २६१, २६२, २०८, २२१, २४०, २४३, २४६, २५२, २९३, ३२४, ३२५ ३२६/१ ३२६/२ या जमिनीचा समावेश आहे.

१७.३ नागपूर महानगर प्रदेशाची विकास योजना दि. ०५/०१/२०१८ अन्वये मंजुर झालेली आहे. सदर मंजुर विकास योजनेनूसार उपरोक्त नमूद जागा अर्बन सेक्टर बाहेर स्थित असून "**कृषी**, SM-3 **नुसार कृषी**, SM-298 **नुसार कृषी**, Water Body, **विद्यमान रस्ता**" या विभागामध्ये समाविष्ट आहे.

१७.४ सदरचे क्षेत्रासह लगतचे काही क्षेत्र नागपूर महानगर क्षेत्राच्या प्रारूप विकास योजनेत Defence Zone मध्ये व काही क्षेत्र औद्योगीक विभागामध्ये दर्शविलेले आहे.

१७.५ उपग्रह नकाशानुसार मौजा शिवा व सावंगा येथील प्रस्तावित फेरबदलाखालील जागेच्या उत्तर–पश्चिम दिशेकडील मंजुर विकास योजनेत "Defence Zone" खाली दर्शविलेल्या जागेत संरक्षण साहित्य निर्मितीचा विद्यमान प्रकल्प असल्याचे दिसून येत असून, या जमीनी लगतचे प्रस्तावाखालील कृषी विभागातील काही जागा या मोकळया असल्याचे दिसून येते. तसेच संरक्षण विभागात समाविष्ट करावायांच्या सर्व्हे क्र. ३४१ व २०३ या दोन जागा संरक्षण विभागाच्या जागेच्या संलग्न नाहीत.

१७.६ वरील सादर केल्याप्रमाणे उक्त अधिनियमाचे कलम ३७ अन्वये फेरबदल करावयाच्या जागेचा तपशील खालीलप्रमाणे आहे.

| मौजा/ तहसिल | सर्व्हे कमांक | क्षेत्र हे.आर | वि.यो. नुसार प्रस्तावित वापर | कलम ३७ अन्वये प्रस्तावित फेरबदल |
|---|---|---|---|---|
| शिवा/ नागपूर (ग्रा.) | ८०, ८९, ९०, ९२ | ११७.३३ | कृषी | औद्योगिक (संरक्षण विभागास आवश्यक असणारे साहित्य व उपकरण निर्मिती करणेसाठी) |
| सावंगा/ नागपूर (ग्रा.) | २०३, २०६, २०७, २११/१, २१३, २१४, २१५,२१६/२, २१६/३, २१७, २१८, २१९/१, २२० ब, २२२, २२३अ, २२३ब, २२४, २२५, २२६, २२७, २२८, २२९/१, २२९/२, २३०/१, २३०/२, २३१, २३२, २३४, २३५, २३६, २३७, २३८, २३९, २४१, २४२, २५९, २६०अ, २६०ब, ३२०, ३२१, ३२७, ३२९/१, ३२९/२, ३४१, २३३, २५४, २५५, २५६, २५७, २५८, २६१, २६२, २०८, २२१, २४०, २४३, २४६, २५२, २९३, ३२४, ३२५ ३२६/१ ३२६/२ | | | |

सदर विषयावर प्राधिकरणाचे विचार होऊन खालीलप्रमाणे ठरावाला मान्यता देण्यात आली.

महानगर आयुक्त
ना.म.प्र.वि.प्रा.

मा. अध्यक्ष
ना.म.प्र.वि.प्रा.

ठराव क्र. १७/१०/२०/१०/२०२५ : "असा ठराव करण्यात येत आहे की, महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ३७ अन्वये मौजा शिवा व सावंगा, तह. नागपूर (ग्रा.) जि. नागपूर येथील ११७.३३ हे.आर जमीन "कृषी" विभागातून वगळून "औद्योगिक (संरक्षण विभागास आवश्यक असणारे साहित्य व उपकरण निर्मिती करणेसाठी)" विभागात समाविष्ट करणेस्तव महाराष्ट्र प्रादेशिक नियोजन व नगर रचना अधिनियम, १९६६ च्या कलम ३७ अंतर्गत फेरबदलाची कार्यवाही करण्यास मंजूरी प्रदान करण्यात येत आहे.

"असाही ठराव करण्यात येत आहे की, सदर फेरबदलाची अधिसूचना शासन राजपत्रात, दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करणे, त्यावर सुचना/हरकतीवर योग्य निर्णय घेऊन, तदनंतर त्यानुसार उक्त प्रस्ताव शासनास मंजूरीस्तव सादर करण्याकरीता महानगर आयुक्त, नामप्रविप्रा यांना अधिकार प्रदान करण्यात येत आहे."

**विषय क्र. १८/१०/२०/१०/२०२५ : नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे मंजूर विकास योजनेमध्ये प्रस्तावित V-J001 (Jail) जेल या आरक्षणाखालील मौजा चिचोली, तह. कामठी, जि. नागपूर येथील खसरा क्र. १३९ (पैकी) व १४० (पैकी) व मौजा तांदुळवाणी, तह. कामठी, जि. नागपूर येथील भुमापन क. ६८, ६९, ७५, ७६ व ७७ येथील ६०.५६ हे.आर क्षेत्र जागा कारागृह विभागाला हस्तांतरीत करण्याबाबत.**

१८.१ सदर प्रस्तावाबाबत महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, उपरोक्त विषयान्वये मौजा चिचोली, तह. कामठी, जि. नागपूर येथील खसरा क्र. १३९ (पैकी) व १४०(पैकी) तसेच लगतच्या मौजा तांदुळवाणी, तह. कामठी, येथील भुमापन क्र. ६८, ६९, ७५, ७६, ७७, ८८ व मौजा बाबुळखेडा, तह. कामठी येथील खसरा क्र. १६९ यामधील जागा हस्तांतरीत करण्याबाबत अधिक्षक, नागपूर मध्यवर्ती कारागृह, नागपूर यांनी दिनांक ३०/०८/२०२५ रोजीच्या पत्रान्वये या कार्यालयास विनंती केलेली आहे.

१८.२ मौजा चिचोली, तह. कामठी, जि. नागपूर येथील खसरा क्र. १३९ (पैकी) व १४०(पैकी) क्षेत्र या जागेवरील प्रस्तावित V-J001 (Jail) जेल, क्षेत्र ६०.५६ हे.आर या आरक्षणाच्या जागेचे स्थानांतरण (Relocation) हे लगतच्या मौजा चिचोली, तह. कामठी, जि. नागपूर येथील भुमापन क्र. १४०, १३९ येथील उर्वरित जागेवर तसेच लगतच्या मौजा तांदुळवाणी, तह. कामठी, जि. नागपूर येथील भुमापन क्र. ६८, ६९, ७५, ७६ व ७७ या जागेवर या कार्यालयाचे दि. १८/०९/२०२५ रोजीच्या आदेशानुसार झालेले आहे.

१८.३ तसेच नागपूर महानगर प्रदेश क्षेत्रातील शासकीय मालकीच्या जमीनी प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करणेस्तव दि. ०२/०५/२०२५ रोजी शासन निर्णय निर्गमित झालेला आहे. त्याअनुषंगाने खालील तक्त्यात नमूद ७/१२ उताऱ्यानुसार जागा या नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे नावे झालेल्या आहे. उपरोक्त नमूद जागेवर 'जेल' विकसीत करण्याचे दृष्टीकोनातून सदरचे क्षेत्र हे नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाकडून संबंधिताना हस्तांतरीत होणे अपेक्षित आहे. त्याबाबतचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.

महानगर आयुक्त
ना.म.प्र.वि.प्रा.

मा. अध्यक्ष
ना.म.प्र.वि.प्रा.

| मौजा | सर्व्हे क्रमांक | ७/१२ उताऱ्या प्रमाणे एकुण क्षेत्र (हे.आर) | हस्तांतरीत करावयाचे क्षेत्र (हे. आर) | भोगवटदाराचे नाव |
|---|---|---|---|---|
| चिचोली | १३९ | ३.०४ | ३.०४ | महाराष्ट्र शासन (नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण, नागपूर) |
| | १४० पैकी | ४०.६९ | ४०.६९ | |
| तांदुळवाणी | ६८ | ७.१४ | ७.१४ | |
| | ६९ | २.८७ | २.८७ | |
| | ७५ | ३.२१ | ३.२१ | |
| | ७६ | ६.२२ | १.७० | |
| | ७७ | १.९१ | १.९१ | |
| एकूण क्षेत्र | | ६५.०८ | ६०.५६ | |

१८.४ उपरोक्त नमूद प्रमाणे एकूण क्षेत्र ६५.०८ हे. आर (७/१२ उताऱ्याप्रमाणे) पैकी 'जेल' चे आरक्षणाकरीता राखीव असलेले एकूण क्षेत्र ६०.५६ हे.आर क्षेत्र संबंधित कारागृह विभागास हस्तांतरीत करावयाचे प्रस्तावित आहे.

१८.५ नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या Disposal of Lands Regulation, २०१९ मधील विनियम क्र. ५ (१) नूसार "No piece of Government land vested in or managed by the NMRDA shall be transferred except with the general or special sanction of the Government given in that behalf" तरतुद आहे.

१८.६ त्याअनुषंगाने उक्त विषयी गृह विभागाद्वारा निर्गमित होणाऱ्या शासन निर्णयाचे अधिन राहुन उपरोक्त नमूद एकूण जागा ६०.५६ हे.आर संबंधित कारागृह विभागास हस्तांतरीत करणेस्तव ना.म.प्र.वि.प्रा. च्या Disposal of Land Regulation 2019 मधील विनियम क्र. ५ (१) नुसार शासनास प्रस्ताव सादर करणे आवश्यक आहे.

सादर केलेल्या बाब टिपणीवर तसेच परिशिष्टावरील मजकुरावर चर्चा झाली व त्यानंतर प्राधिकरणाचे विचार होऊन खालीलप्रमाणे ठरावाला मान्यता देण्यात आली.

**ठराव क्र. १८/१०/२०/१०/२०२५ :** "असा ठराव करण्यात येत आहे की, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे मंजूर विकास योजनेमध्ये प्रस्तावित V-J001 (Jail) जेल या आरक्षणाखालील मौजा चिचोली, तह. कामठी, जि. नागपूर येथील खसरा क्र. १३९ (पैकी) व १४० (पैकी) व मौजा तांदुळवाणी, तह. कामठी, जि. नागपूर येथील भुमापन क्र. ६८, ६९, ७५, ७६ व ७७ येथील एकूण क्षेत्र ६०.५६ हे.आर जागा ना.म.प्र.वि.प्रा. च्या Disposal of Land Regulation 2019 मधील विनियम क्र. ५ (१) नुसार कारागृह विभागाला हस्तांतरीत करण्याबाबतचा प्रस्ताव शासनास सादर करणेकरीता प्राधिकरणाची मंजूरी प्रदान करण्यात येत आहे."

**विषय क्र. १९/१०/२०/१०/२०२५ मौजा–खसरमारी, तह. नागपूर (ग्रामीण), जि. नागपूर येथील खसरा क्र. ४८/१, ४९/१ मधील जमीन संपादनाबाबत यापूर्वीचे नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे दि. १२/०२/२०२५ रोजीचे बैठकीतील ठराव क्र. ८/०९/१२/०२/२०२५ रद्द करण्याबाबत.**

| | |
|---|---|
| महानगर आयुक्त<br>ना.म.प्र.वि.प्रा. | मा. अध्यक्ष<br>ना.म.प्र.वि.प्रा. |

१९.१ सदर प्रस्तावाबाबत महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, नागपूर महानगर क्षेत्राच्या मंजूर विकास योजनेतील मौजा–खसरमारी, तह. नागपूर(ग्रा), जि. नागपूर येथील खसरा क्र. ४८/१, ४९/१ मधील **जमीन संपादन करणेकरीता** सन २०२४–२५ या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकामध्ये "भूसंपादनाची कामे" या लेखाशिर्षाअंतर्गत ४५.० कोटी सुधारीत अंदाजपत्रकीय तरतुदीच्या अधिन राहून मान्यता प्रदान करणेस्तव नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाचे दिनांक १२/०२/२०२५ रोजीचे बैठकीमध्ये ठराव क्र. ८/०९/१२/०२/२०२५ पारित झालेला आहे.

१९.२ शासनाचे नगर विकास विभागाकडील दि. ०२/०५/२०२५ रोजीचे शासन निर्णया नूसार प्राधिकरणाच्या क्षेत्रातील शासकीय जमीनी या प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करावयाचे आहे. त्याअनुषंगाने सदर शासकीय जागा प्राधिकरणाकडे हस्तांतरीत करणेची कार्यवाही सुरू आहे. सबब, प्राधिकरणाकडे सार्वजनिक सुविधेचे विकासाकरीता शासकीय जागा उपलब्ध होईल.

१९.३ उपरोक्त नमूद प्रमाणे अंदाजित ७१६७.६२ हे.आर इतकी शासकीय जमीन या कार्यालयास उपलब्ध होत असल्याने, सद्यस्थितीत सदर मौजा–खसरमारी, तह. नागपूर (ग्रामीण) येथील खसरा क्र. ४८/१, ४९/१ मधील जमीन जमीनीचे भूसंपादन करण्याची आवश्यकता दिसून येत नाही. त्यामूळे भूसंपादन करणेस्तव ४५.० कोटी इतकी रक्कम नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाने खर्च करण्याची गरज भासत नसून, प्राधिकरणाचे दिनांक १२/०२/२०२५ रोजीचे बैठकीतील ठराव क्र. ८/०९/१२/०२/२०२५ निधी मंजूरीबाबतचा ठराव रद्द करण्याचे प्रस्तावित आहे.

१९.४ सादर केलेल्या बाब टिपणीवर तसेच परिशिष्ठावरील मजकुरावर चर्चा झाली व त्यानंतर प्राधिकरणाचे विचार होऊन खालीलप्रमाणे ठरावाला मान्यता देण्यात आली.

**ठराव क्र. १९/१०/२०/१०/२०२५ : "असा ठराव करण्यात येत आहे की, मौजा–खसरमारी,** तह. नागपूर (ग्रामीण), जि. नागपूर येथील खसरा क्र. ४८/१, ४९/१ या जागेमधील जमीन संपादनाबाबत सन २०२४–२५ या आर्थिक वर्षाच्या अंदाजपत्रकामध्ये "भूसंपादनाची कामे" या लेखाशिर्षाअंतर्गत सुधारीत अंदाजपत्रकीय तरतुदीच्या अधिन राहून मान्यता प्रदान केलेल्या यापूर्वीचे प्राधिकरणाचे दिनांक १२/०२/२०२५ रोजीचे बैठकीतील ठराव क्र. ८/०९/१२/०२/२०२५ रद्द करण्यास मान्यता प्रदान करण्यात येत आहे."

**विषय क्र. २०/१०/२०/१०/२०२५ प्रकल्प व परियोजनांच्या निविदांच्या कंत्राट राशीत वाढ किंवा बचतीला मान्यता प्रदान करण्याचे अधिकार सोपविण्याबाबत.**

२०.१ सदर प्रस्तावाबाबत महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या दि. १५.०२.२०२४ रोजीच्या बैठकीत ठराव क्र. ५/०८/१५.०२.२०२४ अन्वये प्रकल्प आणि परियोजनासांठी प्रशासकिय मान्यता व निविदा स्विकृत किंवा अस्विकृत करण्याचे अधिकार देण्यात आले आहेत. त्यानुसार महानगर आयुक्त यांना रू. २५.०० कोटी, कार्यकारी समितीचे अध्यक्ष यांना रू. ७५.०० कोटी व कार्यकारी समितीला रू. १५०.०० कोटी व महानगर प्राधिकरण रू. १५०.०० कोटीच्या वर संपूर्ण प्रशासकीय मान्यता अधिकार तसेच निविदा स्विकृत/अस्विकृत करण्याचे अधिकार आहेत.

महानगर आयुक्त
ना.म.प्र.वि.प्रा.

मा. अध्यक्ष
ना.म.प्र.वि.प्रा.

२०.२ नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणामार्फत प्रकल्प/परियोजना कार्यान्वीत करतांना प्रकल्पस्थळावरील वास्तवीक स्थितीनुसार किंवा उपभोक्ता विभागाच्या सुचनेनुसार निविदेअंतर्गत काही बाबींमध्ये फेरबदल होत असतांना परीमाणांमध्ये वाढ किंवा बचत होत असते. यामुळे कंत्राटराशीत वाढ किंवा बचत होते. शिवाय प्रशासकिय मान्यता प्राप्त अंदाजपत्रकातील रकमेपेक्षा कमी दराच्या निविदा प्राप्त झाल्यास निविदेतील अपेक्षित कामे कंत्राटराशीत पूर्ण होत असतांना अशा कामामध्ये होणाऱ्या बचतीतून, त्याच कामांमध्ये परिस्थितीनुसार किंवा उपभोक्ता विभागाच्या सुचनेनुसार अतिरिक्त कामे हाती घेण्याचे सुधारीत अधिकार प्रदान करण्याबाबत प्रस्तावित आहे.

२०.३ सद्यस्थितीत अशा अतिरीक्त/बचतीसाठी मंजूरी देण्याची मर्यादा नामप्रविप्रा च्या दिनांक १७.१२.२०२० रोजीच्या सहाव्या सभेत ठराव क्र. १०/०६/१७.१२.२०२० अन्वये प्रकल्प व परियोजनांच्या निविदांच्या कंत्राट राशीत वाढ किंवा बचतीला मंजूरी देण्याचे अधिकार खालील तक्त्याप्रमाणे निर्धारीत केले होते.

| अ.क्र. | सक्षम अधिकारी | वित्तीय मर्यादा | वाढीचे/बचतीच्या मंजूरीचे अधिकार (बचत/वाढ रू. कोटीमध्ये) |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | महानगर आयुक्त | रू. २५.०० कोटी पर्यंत | रू. १.०० कोटी पर्यंत |
| २ | अध्यक्ष, कार्यकारी समिती | रू. ७५.०० कोटी पर्यंत | रू. २.५० कोटी पर्यंत |
| ३ | कार्यकारी समिती | रू. १५०.०० कोटी पर्यंत | रू. ५.०० कोटी पर्यंत |

२०.४ नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाच्या ठराव क्र. ५/०८/१५.०२.२०२४ अंतर्गत प्रत्येक स्तरावर मंजूर करण्यात आलेल्या वित्तीय मान्यतेच्या अधीन राहून कंत्राट राशीत वाढीचे/बचतीच्या मंजूरीसंबंधीत आर्थिक अधिकार प्रदान करण्याचे प्रस्तावित आहे.

२०.५ सादर केलेल्या बाब टिपणीवर तसेच परिशिष्ठावरील मजकुरावर चर्चा झाली व चर्चे दरम्यान मा. अप्पर मुख्य सचिव (नवि–१) यांनी सुचित केले की, सदर वाढीचे/बचतीच्या मंजूरीचे अधिकार हे १५% पेक्षा अधिक नसावे. व त्यास मा. अध्यक्ष यांनी सम्मती दिली. त्यानंतर प्राधिकरणाचे विचार होऊन खालीलप्रमाणे सुधारीत प्रस्तावाला मान्यता देण्यात आली.

**ठराव क्र. २०/१०/२०/१०/२०२५ :** **"असा ठराव करण्यात येत आहे की, नागपूर महानगर प्रदेश** विकास प्राधिकरणाच्या ठराव क्र. ५/०८/१५.०२.२०२४ अंतर्गत प्रत्येक स्तरावर मंजूर करण्यात आलेल्या वित्तीय मान्यतेच्या अधीन राहून कंत्राट राशीत वाढीचे/बचतीच्या मंजूरीसंबंधीत खालीलप्रमाणे आर्थिक अधिकार (वाढीचे/बचतीच्या मंजूरीचे अधिकार सद्यस्थितीत असलेल्या वित्तीय मर्यादेच्या १५% फरकाच्या मर्यादेत) प्रदान करण्यात येत आहे."

महानगर आयुक्त
ना.म.प्र.वि.प्रा.

मा. अध्यक्ष
ना.म.प्र.वि.प्रा.

| अ.क्र. | सक्षम अधिकारी | प्रस्तावित तदतुद वाढीचे/बचतीच्या मंजूरीचे अधिकार (बचत/वाढ रू. कोटीमध्ये) |
|---|---|---|
| १ | महानगर आयुक्त | रू. ३.७५ कोटी पर्यंत |
| २ | अध्यक्ष, कार्यकारी समिती | रू. ११.२५ कोटी पर्यंत |
| ३ | कार्यकारी समिती | रू. २२.५० कोटी पर्यंत |

**विषय क्र. २१/१०/२०/१०/२०२५ : नागपूर शहरातील नागपूर महानगरपालिका कार्यक्षेत्रात नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे सुरू असलेले व प्रस्तावित प्रकल्पासाठी कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर ची नियुक्ती करण्याबाबत.**

२१.१ सदर प्रस्तावाबाबत महानगर आयुक्त यांनी असे सांगितले की, प्राधिकरणाच्या बैठकीतील ठराव क्र. १६/०१/०६.११.२०१७ तसेच ठराव क्र. १/०२/२६.०३.२०१८ अन्वये नागपूर सुधार प्रन्यास क्षेत्रात नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण तर्फे सुरू असलेले प्रकल्पांची कामे पुढे चालु ठेवण्यास मंजूरी प्रदान केली. तसेच नागपूर सुधार प्रन्यास बरखास्त झाल्यानंतर सदर कामे नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरण तर्फे पूर्ण करण्यात येईल, असे ठरले.

२१.२ शासनाने नागपूर सुधार प्रन्यास बरखास्त करण्याची कार्यवाही सुरू केल्याने नागपूर सुधार प्रन्यासच्या क्षेत्रासाठीचे "नियोजन प्राधिकरण" म्हणून अधिकार संपुष्टात आल्याबाबतची अधिसुचना दिनांक २७.०८.२०१९ रोजी प्रकाशित केली होती.

२१.३ नागपूर महानगरपालिका क्षेत्रात नागपूर शहरासाठी नागपूर सुधार प्रन्यास तर्फे विविध शासकीय निधी अंतर्गत सुरू/प्रस्तावित असलेली खालील प्रकल्पे पूर्ण करण्यासाठी नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणाला कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून नियुक्त करण्यात आले आहे.

१. मोठा ताजबाग, नागपूर येथील हजरत बाबा ताजुद्दिन दर्गा परीसराचे सौंदर्यीकरण करणे.
२. पवित्र दिक्षाभूमी, नागपूर येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारकाचे सौंदर्यीकरण व विस्तारीकरण करणे.
३. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय, नागपूर येथे कर्करोग उपचाराच्या सोयी सुविधा निर्माण करण्यासाठी रेडीओथेरपी विभागाचे श्रेणीसंवर्धन अंतर्गत बांधकाम करणे.
४. संत चोखामेळा मुला–मुलींचे शासकीय वसतीगृह नागपूर येथील बांधकाम करणे.
५. इंदोरा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचे बांधकाम करणे इत्यादी.

२१.४ शासन अधिसुचना दिनांक ०९.०४.२०२१ अन्वये नागपूर सुधार प्रन्यासच्या क्षेत्रासाठीचे **"नियोजन प्राधिकरण"** म्हणून अधिकार पुनश्च: बहाल करण्यात आले असून नियोजन प्राधिकरण म्हणून नागपूर महानगरपालिका, नागपूर च्या कार्यक्षेत्रात "विकास प्राधिकरण" म्हणून विकास कामे करतांना नागपूर सुधार प्रन्यासला नागपूर महानगरपालिका, नागपूर कडून विकास परवानगी घेण्याची आवश्यकता नसून नागपूर सुधार प्रन्यास नागपूर महानगरपालिका, नागपूर च्या कार्यक्षेत्रात **"नियोजन प्राधिकरण"** म्हणून काम करेल.

महानगर आयुक्त
ना.म.प्र.वि.प्रा.

मा. अध्यक्ष
ना.म.प्र.वि.प्रा.

२१.५ नागपूर शहरातील नागपूर महानगरपालिका, नागपूर क्षेत्रातील नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे सुरू असलेल्या व प्रस्तावित सर्व प्रकल्पासाठी कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून नागपूर सुधार प्रन्यासची नेमणुक करण्याचे प्रस्तावित आहे.

२१.६ सादर केलेल्या बाब टिपणीवर तसेच परिशिष्ठावरील मजकुरावर चर्चा झाली व त्यानंतर प्राधिकरणाचे विचार होऊन खालीलप्रमाणे ठरावाला मान्यता देण्यात आली.

**ठराव क्र. २१/१०/२०/१०/२०२५ :** **"असा ठराव करण्यात येत आहे की,** नागपूर शहरातील नागपूर महानगरपालिका कार्यक्षेत्रात नागपूर महानगर प्रदेश विकास प्राधिकरणातर्फे सुरू असलेले व प्रस्तावित खालील प्रकल्पासाठी –

१. मोठा ताजबाग, नागपूर येथील हजरत बाबा ताजुद्दिन दर्गा परीसराचे सौदर्यीकरण करणे.

२. पवित्र दिक्षाभूमी, नागपूर येथे आंतरराष्ट्रीय दर्जाचे स्मारकाचे सौदर्यीकरण व विस्तारीकरण करणे.

३. शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रूग्णालय, नागपूर येथे कर्करोग उपचाराच्या सोयी सुविधा निर्माण करण्यासाठी रेडीओथेरपी विभागाचे श्रेणीसंवर्धन अंतर्गत बांधकाम करणे.

४. संत चोखामेळा मुला–मुलींचे शासकीय वसतीगृह नागपूर येथील बांधकाम करणे.

५. इंदोरा येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर सुपर स्पेशालिटी हॉस्पिटलचे बांधकाम करणे इत्यादी व इतर कार्यान्वयीन यंत्रणा म्हणून नागपूर सुधार प्रन्यास, नागपूर ची नियुक्ती करण्याबाबतचा प्रस्तावास मान्यता देण्यात येत आहे."

त्यानंतर, माननीय अध्यक्ष व सदस्य यांचे आभार मानून बैठकीचे कामकाज समाप्त करण्यात आले.

| | |
|---|---|
| महानगर आयुक्त<br>ना.म.प्र.वि.प्रा. | मा. अध्यक्ष<br>ना.म.प्र.वि.प्रा. |